महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर
539, राजेंद्रनगर, कोल्हापूर-416 004.

दुरध्वनी क्र-0231-2696101/2/3 Website-www.sscboardkolhapur.in Email Id- divsec.kop@gmail.com

क्र.कोविमं/इ.12वी/परीक्षा/ 1810
दिनांक : 23/05/2026

प्रति,
प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालय,
सातारा, सांगली, कोल्हापूर.

**विषय :- फेब्रु-मार्च 2026 मध्ये झालेल्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12 वी) परीक्षेच्या गुणपत्रक तथा प्रमाणपत्र, स्थलांतर प्रमाणपत्र व इतर साहित्य वाटप, गुणपत्रिका दुरुस्ती आणि श्रेणी सुधार योजने अंतर्गत (Class Improvement Scheme) प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिकांबाबत.**

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, आपल्या कनिष्ठ महाविद्यालयामार्फत फेब्रु-मार्च 2026 मध्ये झालेल्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12वी) परीक्षेस प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांच्या मुळ गुणपत्रक तथा प्रमाणपत्र, स्थलांतर प्रमाणपत्र आणि तपशिलवार गुण दर्शविणारे कनिष्ठ महाविद्यालयीन अभिलेख संबंधित वितरण केंद्रावर रविवार दि.24/05/2026 रोजी सकाळी 11.00 ते दुपारी 2.00 पर्यंत हस्तपोहोच वाटप करण्यात येणार आहे. तरी सोमवार दि. 25/05/2026 रोजी सकाळी 11.00 वाजता आपल्या कनिष्ठ महाविद्यालयाच्या अधिकृत प्रतिनिधीस पत्रासह वितरण केंद्रावर पाठविण्याची व्यवस्था करावी आणि विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिका व स्थालांतर प्रमाणपत्रांचे आपल्या कनिष्ठ महाविद्यालयात सोमवार दि. 25/05/2026 रोजी दुपारी 3.00 वाजता वाटप करण्यात यावे.

**अ) गुणपत्रिका स्वीकारण्याबाबत व वितरीत करण्याबाबत सूचना -**

1. सदर सर्व गुणपत्रिका व स्थलांतर प्रमाणपत्र आपल्याच कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या आहेत याची खात्री करावी. अन्य कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिका अथवा स्थलांतर प्रमाणपत्र प्राप्त झाल्या असतील तर त्या सिलबंद करुन आपल्या प्रतिनिधीमार्फत त्वरीत या कार्यालयाकडे जमा करण्यात याव्यात.
2. आपल्या कनिष्ठ महाविद्यालयातील एखाद्या विद्यार्थ्याची गुणपत्रिका अथवा स्थलांतर प्रमाणपत्र प्राप्त न झालेस अथवा खराब छपाई असल्यास दि.01/06/2026 अखेर मंडळ कार्यालयास लेखी पत्राव्दारे कळविण्यात यावे. तद्नंतर काही त्रुटी राहील्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आपल्या कनिष्ठ महाविद्यालयाची राहील याची नोंद घ्यावी.
3. सर्व गुणपत्रिकांवर मा. विभागीय सचिव यांची स्वाक्षरी असल्याची खात्री करावी. गुणपत्रिकांवरील नोंदी उदा. विद्यार्थ्यांचे नाव, नावाचे स्पेलिंग व विषय इ. माहिती कनिष्ठ महाविद्यालयाच्या अभिलेखावरुन बिनचूक तपासण्यात याव्यात. त्यानंतरच विद्यार्थ्यांस गुणपत्रिका वितरीत करण्यात यावी.

**ब) गुणपत्रिकांमधील दुरुस्तीबाबत सूचना -**

गुणपत्रिकांमध्ये काही त्रुटी असल्यास दुरुस्तीसाठीचे प्रस्ताव गुणपत्रिका मिळाल्यापासून एक महिन्याच्या आत (दि.25/06/2026 अखेर) मंडळ कार्यालयात समक्ष सादर करण्यात यावेत. दुरुस्ती प्रस्तावासोबत खालीलप्रमाणे कागदपत्रे आवश्यक आहेत.

1. प्रती गुणपत्रिकेतील प्रत्येक चूकीच्या नोंदीसाठी रु.200/- आणि नवीन गुणपत्रिकेसाठी रु.200/- असे एकूण रु.400/- शुल्क भरावे लागेल.
2. कनिष्ठ महाविद्यालयाच्या जनरल रजिस्टरमधील संबंधित विद्यार्थ्यांच्या नावाची नोंद असलेल्या पानाची प्राचार्यांनी प्रमाणित केलेली छायांकीत प्रत
3. दुरुस्ती यापूर्वीच म्हणजेच प्रिलिस्ट व प्रवेशपत्र प्राप्त झाल्यानंतर का कळविली नाही याबाबत संबंधित प्राचार्य व लिपिक यांचा मा. विभागीय सचिव यांच्या नावे वस्तुनिष्ठ खुलासा सादर करावा.

**क) श्रेणी सुधार योजने अंतर्गत (CIS) प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिकांबाबत सूचना -**

1. फेब्रु-मार्च 2026 मध्ये झालेल्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12 वी) परीक्षेस श्रेणी सुधार योजने अंतर्गत (CIS) प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांनी दि.25/06/2026 अखेर विकल्प देणे अनिवार्य राहिल. तसेच त्यानंतर पाच महिने प्रति महिना रु. 500/- जादा शुल्क आकारुन विकल्प स्वीकारता येईल. या कालावधीत विकल्प न दिल्यास फेब्रु-मार्च 2026 परीक्षेची संपादणूक रद्द करुन पूर्वीच्याच परीक्षेची संपादणूक ग्राह्य धरण्यात येईल.
2. विकल्पाचा नमुना फॉर्म या परिपत्रकासोबत जोडला आहे.
3. श्रेणी सुधार योजने अंतर्गत (CIS) प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांनी कनिष्ठ महाविद्यालयाचे शिफारस पत्रासह विकल्प फॉर्म आणि पूर्वीच्या परीक्षेची (इ.12वी) मूळ गुणपत्रिका व प्रमाणपत्र मंडळ कार्यालयास सादर केल्यानंतरच फेब्रु-मार्च 2026 ची मूळ गुणपत्रिका हस्तपोहोच देण्यात येतील याची नोंद घ्यावी.
4. विकल्प फॉर्म अथवा पूर्वीच्या परीक्षेची (इ.12वी) मूळ गुणपत्रिका अभावी कोणत्याही विद्यार्थ्यास फेब्रु-मार्च 2026 ची मूळ गुणपत्रिका देण्यात येणार नाही अशी स्पष्ट सूचना सर्व विद्यार्थ्यांना देण्यात यावी.
5. आपल्या कनिष्ठ महाविद्यालयातील श्रेणी सुधार योजने अंतर्गत (CIS) प्रविष्ठ झालेल्या सर्व विद्यार्थ्यांना फेब्रु-मार्च 2026 परीक्षेचा ऑनलाईन निकाल जून्या निकालासोबत तूलना करुन विकल्प फॉर्म भरण्याबाबत सूचना देण्यात याव्यात आणि ज्या विद्यार्थ्यांना फेब्रु-मार्च 2026 परीक्षेचा CIS चा निकाल स्वीकारावयाचा नाही अशा विद्यार्थ्यांकडूनही त्यापध्दतीने विकल्प फॉर्म भरून घेऊन तो कनिष्ठ महाविद्यालयांनी दि.25/06/2026 अखेर मंडळ कार्यालयात सादर करावा.

(अनुराधा म्हेत्रे)
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

सोबत - श्रेणी सुधार योजने अंतर्गत (CIS) प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांकरिता विकल्प फॉर्म नमूना.

प्रत माहितीस्तव,
सर्व वितरण केंद्र प्रमुख (उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा),
जिल्हा - सातारा, सांगली, कोल्हापूर.

## महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
## कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर
### उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इ.12 वी ) श्रेणीसुधार योजना विकल्प फॉर्म

मी (विद्यार्थ्यांचे /विद्यार्थीनीचे नाव )------------------------------------------------------------फेब्रु-मार्च 2026 च्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेस श्रेणीसुधार योजनेअंतर्गत ------------------------------------या कनिष्ठ महाविद्यालयामार्फत प्रविष्ठ होऊन उत्तीर्ण झालो/ झाले आहे. माझी फेब्रु-मार्च 2026 परीक्षेची संपादणुक खालीलप्रमाणे आहे.

बैठक क्रमांक ----------------------

| अ.क्र. | विषय | संपादन केलेले गुण |
|---|---|---|
| 1 | | |
| 2 | | |
| 3 | | |
| 4 | | |
| 5 | | |
| 6 | | |
| एकूण गुण | | |
| टक्केवारी | | |

मी यापूर्वी फेब्रु-मार्च/जुलै-ऑगस्ट----------------च्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा-------------------------------------------------------- या कनिष्ठ महाविद्यालयामार्फत प्रविष्ठ होऊन उत्तीर्ण झालो/झाले आहे. त्या परीक्षेची संपादणूक खालीलप्रमाणे आहे.

बैठक क्रमांक ----------------------

| अ.क्र. | विषय | संपादन केलेले गुण |
|---|---|---|
| 1 | | |
| 2 | | |
| 3 | | |
| 4 | | |
| 5 | | |
| 6 | | |
| एकूण गुण | | |
| टक्केवारी | | |

वरील दोन्ही परीक्षांचा तुलनात्मक विचार करता मी ( विद्यार्थ्यांचे / विद्यार्थीनीचे नाव ) ------------------------------------------ असे लिहुन देतो/देते की, माझे फेब्रु-मार्च/जुलै-ऑगस्ट------------- च्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेतील बैठक क्रमांक-------------------- अन्वये दिलेल्या परीक्षेतील एकूण गुण व गुणांची टक्केवारी अधिक असल्याने त्या परीक्षेचा निकाल स्वखुशीने स्वीकारण्यास तयार आहे.

तसेच फेब्रु-मार्च/जुलै-ऑगस्ट------------- च्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेतील बैठक क्रमांक------------------- अन्वये दिलेल्या परीक्षेतील एकूण गुण व गुणांची टक्केवारी कमी असल्याने त्या परीक्षेची संपादणुक रद्द करण्यास माझी संमती आहे.

विद्यार्थ्यांचे/विद्यार्थीनीचे नाव -
विद्यार्थ्यांची/विद्यार्थीनीची स्वाक्षरी -

प्राचार्यांची स्वाक्षरी
कनिष्ठ महाविद्यालयाचा शिक्का